**Topic No – IV**

# सामाजिक समूह

# (Social Group)

**-सामाजिक समूह : अर्थ आणि वैशिष्टे**

**-सामाजिक समूहाच्या वर्गीकरणाचे आधारभूत घटक**

**-प्राथमिक आणि दुय्यम समूह**

**प्रस्तावना -**

महान तत्वज्ञ "ॲरिस्टॉटल." यानी म्हटल्या प्रमाणे 'मनुष्य एक सामाजिक प्राणी आहे" मनुष्याला एकट राहणे आवडत नाही. म्हणून तो समूह करून राहतो. समूह करून राहिल्यामुळेच आपल्या व्यक्तीमत्त्वाचा विकास होत जातो. व्यक्तींचे परस्पर संबंध प्रस्थापित होतात. व्यक्तीच्या गरजा पूर्ण केल्या जातात. समाजाचा विकास होत जातो. म्हणून सामाजिक समूह समाजामध्ये महत्त्वाचे आहेत. हॅरी जॉन्स नंतर रामाजशास्त्राला 'सामाजिक समूहाचे शास्त्र" असे म्हणतात.

समूह म्हणताच आपल्या मनात कोणत्याही वस्तु ज्या एकत्रित आहेत. परस्परांच्या निकट आहेत त्यांचा समूह नजरेसमोर येतो. उदा. धान्याच्या कोठारातील धान्याची पोति, पुस्तकांच्या कपाटातील पुस्तके, घरांच्या बांधकामासाठी आणलेल्या विटा, पण यांना सामाजिक समूह म्हणता येत नाही. कारण या वस्तु एकत्रीत आल्या तरी त्यांच्यात कोणत्याही प्रकारची परस्पराबद्दलच्या अस्तित्वाची जाणिव नसते म्हणजे त्यांच्यात आंतर क्रिया नसते. सामाजिक समूह केवळ दोन अगर जास्त सजीवांच्या प्रत्येक्ष वा अप्रत्यक्षपणे एकत्र येण्यानेच शक्य होतो कारण त्यांचात कोणत्या ना कोणत्या प्रकारची आंतरक्रिया चालू असते.

इतर प्राण्यांचा समूहापेक्षा मानवाच्या समूहाचे स्वरूप व महत्व अत्यंत वेगळे आहे. मानव प्राण्याचा समूहात सतत आंतरक्रिया चालु असतात. काही समान उदिदष्टाची पुर्तता करून घेण्यासाठी, समान कार्य करण्यासाठी ते एकत्रित आलेले असतात. त्यांच्यात एकतेची भावना प्रकर्षाने दिसुन येते. उदा. कुटुंब, मित्र मंडळ, कामगार संघटना, राजकीय पक्ष, राष्ट्र वगैरे.

**सामाजिक समूहाची व्याख्या-**

**१. ऑम्बर्न व निमकॉफ-**

" जेव्हा दोन किंवा अधिक व्यक्ती एकत्रित येतात आणि परस्परांना प्रभावित करतात तेव्हा त्या व्यक्तीचा सामाजिक समूह बनतो."

**२. हॉर्टन व हंट यांच्या मते**

"समूह म्हणजे आशा लोकांचा समूह की ज्याना आपले सदस्यत्व व आंतरक्रिया याची जाणिव असते."

**3. मेरिल व एल्ड्रेज यांच्या मते-**

"दोन किंवा अधिक व्यक्ती ज्या बऱ्याच काळ पर्यन्त एकमेकांशी संपर्क ठेवत असतात व समान उद्दिष्टानुसार कार्य करीत असतात त्याना सामाजिक समूह म्हणता येईल "

## A) सामाजिक समूहाची वैशिष्ट्ये -

सामाजिक समूहाची काही ठळक वैशिष्ट्ये पुढील प्रमाणे-

**१. कमीत कमी दोन व्यक्तीची आवश्यकता** -

सामाजिक समूहाच्या निर्मितीसाठी किमान दोन व्यक्तीची तरी आवश्यकता असते. समूह निर्मितीसाठी जी आंतरक्रिया आवश्यक असते ती घडून येण्यासाठी कमीत कमी दोन तरी व्यक्तीची जरुरी असते आणि जास्तीत जास्त कितीही व्यक्तीचा समूह होऊ शकतो. उदा. पती-पत्नी शिक्षक-विद्यार्थी आशा दोन व्यक्तीचा समूह होऊ शकतो. तर महाविद्यालय, जात, धर्म, आशा विशाल आकाराचाही सामाजिक समूह होऊ शकतो.

**२. समान उदिष्ट्ये -**

सर्वसामान्यपणे समान उदिष्ट्ये किंवा हेतु, समान कार्य असणा-या व्यक्ती एकत्रित येतात आणि समूह निर्माण करतात. म्हणजे प्रत्येक सामाजिक समूहाचे कोणतेना कोणतेतरी एक समान उदिदष्टय असते उदा. खेळाडूंचा संघ, कामगार संघटना, शैक्षणिक संस्था इत्यादी सामाजिक समूह एक समान उद्दिष्टे, कार्ये पूर्ण करण्यासाठी निर्माण झालेली असतात.

**3. सामाजिक आंतरक्रिया** -

समान उदिदष्ट्याची प्राप्ती करून घेण्यासाठी व्यक्ती एकत्रीत आल्यातरी त्यांच्यात सामाजिक आंतरक्रिया होणे अत्यावश्यक आहे. त्यांच्यात प्रत्यक्ष- अप्रत्यक्ष संबंध निर्माण होणे आवश्यक असते.

पती-पत्नी चे विवाहामुळे नाते निर्माण झाले पण आपआपसात बेबनाब होऊन ते घटस्फोट न घेता वेगळे राहू लागले तरी त्यांना समूहाचे स्वरूप राहत नाही.

**४. मानसिक दृष्टया एकात्मता** -

समान उदिष्टांची पुर्तता करण्यासाठी एकत्र येऊन सामाजिक अंतरक्रिया घडवून आणणा-या व्यक्तींच्यात आपणास मानसिकदृष्ट्या एकात्मता दिसून येते. मानसिकदृष्ट्या एकात्मतेची जाणीव असल्याशिवाय व्यक्ती एकत्र राहणे कठीण असते. ज्या समूहात अशी मानसिक दृष्ट्या एकात्मतेची जाणिव विघटीत होते, तेथे समान उदिदष्ट्ये पूर्ण होण्यास अडचणी निर्माण होतात. दुस-या शब्दात असे म्हणता येते की, समूहातील सदस्यांत समान उदिदष्ट्याची पुर्तता होण्यासाठी एकतेची जाणीव निर्माण झालेली असते. आशा एकतेच्या जाणिवेशिवाय सामाजिक समूह निर्माण होणे शक्य नसते. या जाणिवेमुळे आपला समूह हा दुसऱ्या समूहापेक्षा वेगळा आहे याची जाणिव निर्माण होते. या मानसिकदृष्ट्या एकात्मतेच्या जाणिवेमुळेच सदस्यात आपुलकीची भावना we felling दिसुन येते.

**५. टिकाऊ स्वरूपाचा संपर्क-**

समूह आकाराला येण्यासाठी समान हेतू, आंतरक्रिया व मानसिकदृष्ट्या एकात्मता या गोष्टी आवश्यक असतात. त्यासाठी समूह सदस्यातील संपर्क जास्तीत जास्त टिकाऊ हवा, त्यासाठी समूह सदस्यांतील सबंध कायम स्वरूपाचे व स्थीर असले पाहिजे. त्यामुळे दिर्घकाळ आंतरक्रिया चालु राहते, आंतरकियेचे जितके प्रमाण तितके समूह सदस्यांत घनिष्ट संबंध निर्माण होतात. उदा. रेल्वेच्या एका कक्षातून मुंबई ते कलकत्ता असा प्रवास करणा-या व्यक्तीत गप्पा-गोष्टी, चहापाणी जेवन वगैरे गोष्टी होऊन प्रवास संपताच थोड्या अवधीत ते परस्परांना विसरून जातात. कारण त्याच्यात टिकाऊ स्वरूपाच संपर्क प्रस्थापित होत नाहीत. या उलट एका गावातील भजनी मंडळातील सदस्यांत टिकाऊ स्वरूपाचे संपर्क प्रस्थापित झाल्याने तो समूह दिर्घकाळ अस्तित्वात राहतो.

**५ समूहाच स्वतंत्र अस्तित्व** -

प्रत्येक सामाजिक समूहांचे स्वतंत्र अस्तित्व असते. समूहातील व्यक्ती परस्परांशी वागताना परस्परांची जाणिव ठेऊन वागतात. समूहातील एका सभासदाला आपल्या वर्तनाचा किंवा कृतिचा दुसऱ्या सभासदावर कोणता परिणाम होईल याची जाणिव असते. यामुळे व्यक्तीचे समूहातील सभासदां बराबरचे वर्तन आणि समूहाबाहेरील सभासदा बरोबरचे वर्तन यात भिन्नता दिसुन येते. या वरून समूहाचे स्वतंत्र अस्तित्व असते हे स्पष्ट होते.

**६. समूहाची प्रमाणके अगर नियमने-**

समूहातील सभासदांनी परस्परांशी कसे वर्तन करावे वा करू नये, या बाबत समूहाची नियमने सभासदाना मागदर्शन करतात. उदा. वडील धार्यांचा आदर करावा. विद्यार्थीनी अज्ञार्थी असावे. खरे

बोलावे, इ. नियमनामुळे सभासदानी कोणते वर्तन ठेवावे किवा ठेवू नयेत या संबंधाची पुर्णकल्पना येते. म्हणजेच सामाजिक समूहाची नियामने समूहातील सभासदाना अनुसरावी लागतात.

**७. समूहाची विशिष्ट रचना-**

प्रत्येक सामाजिक समूहाची विशिष्ट अशी संरचना असते. कारण समूहातील सभासदांना समूहातील विशिष्ट अशी संरचना समूहात विशिष्ट स्थान किंवा दर्जा असतो. उदा. कुटुंब या समुहात आई, वडील, मुलगा, मुलगी इ. विशिष्ट दर्जे असतात. हे दर्जे परस्पराशी संबंधित असतात. महाविद्याल या समूहात प्राचार्य, प्राध्यापक, विद्यार्थी कारकून महाविद्यालय कलर्क, शिपाई, अशी विशिष्ट स्थाने किंवा दर्जे आहेत. या स्थानाना दर्जाना अनुसरून समूहाला संरचना प्राप्त होत असते. अर्थात समाजातील प्रत्येक सामाजिक समूहांना विशिष्ट अशी संरचना असते.

## B) सामाजिक समूहाच्या वर्गीकरणाचे आधार/प्रकार –

प्रत्येक समाजात अनेक सामाजिक समूह आढळुन येतात. या विभिन्न सामाजिक समूहामधे अनेक बाबतीत फरक असतो. समूहाचे प्रकार करण्यासाठी समूहाच्या समान वैशिष्ट्यासंबंधी विचार करावा लागतो. यासंबंधी शास्त्रज्ञानी समूहाचे वेगवेगळे प्रकार केले आहेत. ते पुढीलप्रमाणे-

**१.समूहाचा आकार-**

जर्मन सामाजशास्त्रज्ञ जॉर्ज सीमेल यांनी समूहातील सदस्यांच्या संख्येवर समूहाचा आकार अवलंबुन असतो. या निकषावर सामाजिक समूहाचे दोन प्रकार पाडले आहेत.

**अ) लहान समूह-**

ज्या समूहामध्ये सदस्यांची संख्या कमी अगर मर्यादित असते. तेव्हा त्या समूहाला लहान समूह असे म्हणतात, उदा. कुटुंब,

**ब) मोठा समूह-**

ज्या समूहातील सदस्यांची संख्या मोठी अधिक अगर विशाल असते त्या समूहाला मोठा समूह असे म्हणतात. उदा. धर्म, राजकीय पक्ष, जात, राष्ट्र इ

**2. समूहाच्या सदस्यत्वाचे स्वरूप-**

अमेरिकन समाजशास्त्रज्ञ लेस्टर वार्ड व गीडींग्ज यांनी समूहाचे सदस्यत्व स्वीकारणे अगर न स्विकारणे व्यक्तीच्या इच्छेवर अवलंबुन असते अगर नसते या या निकषावर सामाजिक समूहाचे होने प्रकार केले जातात.

**अ) ऐच्छिक समूह -**

समूहाचे सदस्यत्व स्विकारणे अगर न सिकारणे हे व्यक्तीच्या इच्छेवर अवलंबुन असते त्या समूराला ऐच्छिक समूह असे म्हणतात. उदा. राजकीय पक्ष, महिला मंडळ, क्रिडामंडळ, सांस्कृतिक मंडळ इ. समूहाचे सदस्यत्व स्वीकारणे हे व्यक्तीचा इच्छेवर अवलंबून असते.

**ब) अनिवार्य समूह -**

एखादया समूहाचे सदस्य स्वीकारणे अथवा न स्वीकारणे हे व्यक्तीच्या इच्छेवर अवलंबुन नसते ते त्याला जन्मत: प्राप्त होत असते. त्या समूहाला अनिवार्य समूह म्हणतात. उदा. कुटुंब जात वेश धर्म इ. समूहाचे सदस्यत्व व्यक्तीला जन्माबरोबर प्राप्त होत असते.

**3. समूहाची कालमर्यादा-**

एखाद्या समूहाचे अस्तित्व किती काळ टिकते. या निकषावर समूहाचे दोन प्रकार पडतात.

**अ) अस्थायी समूह-**

ज्या समूहाचे अस्तित्व अत्यंत अल्पकाळ टिकते त्याना अस्थायी समूह असे म्हणतात.

उदा झुंड, जमाव इ. समूहाचे अस्तित्व अत्यंत अल्पकाळ टिकत आणि कार्यपद्धती लवचिक असते.

**ब) स्थायी समूह-**

ज्या समूहाचे अस्तित्व दिर्घकाळ टिकते किंवा जवळ जवळ कायम टिकुन राहते. त्या समूहाना स्थायी समूह असे म्हणतात उदा. कुटुंब, जात, वंश धर्म .इ.

**४. समूहांची संघटना -**

कोणत्याही सामाजिक समूहाच्या अस्तित्वासाठी त्या समूहाला संघटना अथवा रचना असावी लागते. पण हे संघटनेचे प्रमाण सर्वच समूहात सारखे असत नाही. या आधारावर समूहाचे दोन प्रकार पडतात.

**अ) विशिष्ट संघटित समूह-**

ज्या समूहाची रचना किंवा संघटना सुव्यवस्थीत अथवा काटेकोर असते, समूहातील सदस्यांच्या भूमिका हक, परस्पर संबंध, नियमने या संबंधी नियम आढळतात. त्या समूहाना विशेष संघटीत समूह म्हणतात. उदा:- कामगार संघटना, राजकिय पक्ष, महाविद्यालय, इ: समूह हे संघटीत आहेत.

**ब) बहुतांशी असंघटीत समूह** -

ज्या समूहाच्या संघटनचे प्रमाण अत्यल्प असते. समूहातील दर्जे, भूमिका, मियमने इ. बाबी निश्चित स्वरुपात ठरलेल्या नसतात. त्या समूहांना बहुतांशी असंघटीत समूह असे म्हणतात.

उदा. झुंड, जमाव, वर्ग या सारख्या समूहाचा समावेश बहुतांशी असंघटीत समूहात केला जातो.

**५. समूहाच्या हितसंबंधावर आधारित प्रकार-**

समूहाच्या हितसंबंधाची जपणूक करण्यासाठी काही समूह निर्माण होत असतात. या हितसंबंधाच्या स्वरूपाच्या निकषावर समूहाचे दोन प्रकार पडतात.

**अ) विशिष्ट हितसंबंधी समूह** -

एखादया दुसऱ्या हितसंबंधाची पुर्तता करण्यासाठी सामाजिक समूह अस्तित्वात येतात तेव्हा त्या समूहाना विशिष्ट हितसंबंधी समूह असे म्हणतात. उदा. शिक्षणसंस्था, शेतकरी संघटना,

विद्यार्थी संघटना 'कामगार संघटना ई या समूहातील सदस्य विशिष्ट उदिदष्ट्यांच्या पुर्ततेसाठी एकत्र येऊन काम करतात. हित साधन्याचा प्रयत्न केला जातो.

**ब) सर्वसमावेशक हितसंबंधी समूह** -

ज्या समूहात सदस्याच्या सर्वांचे हितसंबंधाचे संरक्षण व सर्वधन केले जाते तेव्हा त्या समूहाला सर्वसमावेशक हितसंबंधीत समूह म्हणतान उदा- गाव, शहर, राष्ट्र इ या समूहमध्ये व्यक्तीच्या सर्वच हितसंबंधाची जपणूक केली जाते.

**६. समूहातील सदस्यांचा समूहाकडे पाहण्याचा दृष्टीकोन-**

अमेरिकन समाजशास्त्र विल्यम ग्रहम् सम्नर यानी आपल्या समूहाकडे आणि दुसऱ्या समूहाकडे व्यक्ती कोणत्या दृष्टिने पहाते या निकषानुसार समूहाचे दोन प्रकार केले आहेत.

**अ) अंर्तसमूह-**

व्यक्ती ज्या समूहाची सदस्य असतात त्याना समूहाना अंर्तसमूह असे म्हणतात. त्या समूहातील व्यक्तीबद्दल आपलेपणा, सहकार्य जिव्हाळा असतो आपल्या समूहाबाबत व्यक्तीला प्रेम आणि अभिमान वाटतो. उदा-आपली शाळा, आपले गाव, आपले कुटुंब, देश.

**ब) बहिरसमूह-**

व्यक्ती ज्या समूहाची सदस्य नसतात त्या 'समूहाना बहिरसमूह असे म्हणतात, या समूहाबद्दल बक्तीला आपलेपणा वाटत नाही. आपला समूह सोडून अन्य समूह आणि या समूहातील सभासंदाबाबतच्या भावना दुरावलेल्या असतात. उदा. हिंदूना मुस्लीम समूह हा बहिरसमूह वाटतो तर मुस्लीमांना हिंदू हा बहिरसमूह वाटतो.

**७. समूहातील सदस्याच्या संबंधाची स्वरूप-**

समूहातील सभासदाच्या सामाजिक सबंधाचे स्वरूप या निकषावर समूहाचे दोन प्रकार पडतात.

**अ) प्राथमिक समूह**

ज्या समूहातील सभासदांचे परस्पर संबंध घनिष्ट, प्रत्येक्ष आणि समोरासमोरचे असतात. त्या समूहाना प्राथमिक समूह असे म्हणतात. उदा. कुटुंब, मित्र, शेजारी, खेडे. इत्यादी.

**ब) दुय्यम समूह-**

ज्या समूहातील सदस्यांचे परस्पर संबंध घनिष्ट प्रत्यक्ष आणि समोरचे नसतात तर ते अप्रत्यक्ष दूरचे असतात त्या समूहाना दुय्यम समूह असे म्हणतात. उदा. शहर, कामगार संघटना इत्यादी.

## C. प्राथमिक समूह आणि दुय्यम समूह- Primary and secondary Group-

### अ) प्राथमिक समूह Primary Group’s-

अमेरिकेन समाजशास्त्रज्ञ चार्लस कुले यानी १९०९ मध्ये 'Social organization" या ग्रंथात प्राथमिक समूहाची संकल्पना मांडली. या प्राथमिक समूहाचे मानवी जीवनावर अत्यंत दुरगामी परिणाम होतात. कारण या समूहामध्ये विलक्षण आपलेपणाची भावना We felling व एकता तीव्रतेने दिसुन येते.

**व्याख्या-**

**चार्लस कुले-**

ज्या समूहामध्ये अतिशय निकटच समोरासमोरचे संपर्क व सहयोग ही वैशिष्टये दिसून येतात. त्या समूहाना प्राथमिक समूह म्हणतात. म्हणजे प्राथमिक समूहातील सदस्यात परस्परांशी समोरासमारचे संपर्क आल्याने घनिष्ट संबंध निर्माण झालेले असतात.

### प्राथमिक समूहाच्या निर्मितीसाठी आवश्यक भौतिक बाबी -

**१. सदस्यामधील भौतिक सानिध्य-**

समूहातील सदस्यामध्ये घनिष्ट संबंध निर्माण होण्यासाठी त्याच्यात भौतिक सानिध्य असणे आवश्यक आहे. सदस्यामध्ये खेळणे, खाणे-पिणे, चालणे-बोलणे, गप्पा मारणे इत्यादी बाबीमुळे घनिष्टता आणि जवळीकता निर्माण होते. परस्परांशी प्रेमाचे आपुलकीचे सबंध निर्माण होतात.

**2. समूहाचा मयादित किंवा लघु आकार-**

समूहातील सदस्यांची संख्या मर्यादित, कमी असेल तर सर्वच सदस्य एकमकाना ओळखु शकतात. सर्वानाच सामुदायिकपणे कराव्या लागणा-या कामात सहभागी होता येते. यामुळे त्यांच्यात निकटता प्रस्थापित होते.

**३. सदस्यांमधील सबंधाचे सातत्य** -

प्राथमिक समूहातील सदस्यामध्ये "आम्ही" ची भावना म्हणजेच आत्मियतेची भावना निर्माण होण्यासाठी त्यांच्या परस्पर संबंधामध्ये स्थिरता आणि सातत्य असणे आवश्यक आहे. व्यक्ती जास्त काळ परस्परांशी संबंधित असतील तितके त्यांचे संबंध स्थिर आणि घनिष्ट होत जातात, पति-पत्नी, कुटुंब, शेजारी, खेडयातील लोक यांचे दिर्घकाळ घनिष्ट संबंध हे प्राथमिक समूहाचे उदाहरण म्हणून देता येते.

**प्राथमिक समूहाची वैशिष्टये :- पुढील प्रमाणे-**

**१. प्राथमिक समूहाची निर्मिती -**

प्राथमिक समूह जाणिव पुर्वक निर्माण झालेले नसतात तर ते आपोआप निर्माण झालेले असतात. व्यक्ती परस्परांच्या सहवासात येतात. त्यांच्या मध्ये वारंवार आंतरक्रिया घडुन येतात. यातुनच व्यक्तीचे परस्पर सबंध घनिष्ट स्वरूपाचे निर्माण होतात आशा प्रकारो प्राथमिक समूहाची निर्मिती आपोआप निर्माण होते.

**२. प्राथमिक समूहातील सदस्यात समान उद्दिष्टे -**

प्राथमिक समूहातील सदस्यांतील उदिदष्टयांमध्ये एकसारखेपणा आढळून येतो. सर्वच सदस्यांचा आशा आकांक्षा, आवडी-निवडी, व जगाकडे बघण्याचा दृष्टीकोन एकच असतो. त्यामुळे त्यांचे उद्दिष्ट्ये समान असते. व त्यांची करण्यासाठी सर्वजण प्रयत्नशील राहतात, कुटुंबात दोन जीवलग मित्रात या गोष्टी दिसून येतात. या समूहातील सदस्यामध्ये इतकी एकात्मता निर्माण झालेली असते की प्रत्येक जण एक दुसऱ्याच्या हिताची काळजी घेतात. आपल्या मित्राने राईट वर्तवणूक केली तर त्याला त्याबद्दल आपण रागावतो. याचे कारण म्हणजे त्या समूहातील सदस्यांत असलेली उदिदष्टयांची समानता होय.

**३. प्राथमिक समूहातील सदस्य एकमेकासाठी जगणे हे साध्य मानतात-**

प्राथमिक समूहातील सदस्यांतील जे संबध असतात ते साधनमात्र नसतात. एकमेकासाठी "जगणे" हे त्यांचे ध्येय असते म्हणजे एखादा स्वार्थ अगर उदिदष्टये साधण्यासाठी हे सबंध असत नाहीत. कुटुंबातील सदस्य अगर दोन जीवलग मिश्र आशा व्यावहारिक स्वार्थासाठी एकत्रित आलेले नसतात. आई-बाप मुलांसाठी राबतात ते मुलांनी सुखी व्हावे म्हणून म्हणजे समुहातील सदस्य एकमेकासाठी जगणे साध्य मानतात.

**४. समूहातील सदस्यांचे स्थान -**

प्राथमिक समूहातील प्रत्येक सदस्यांच्या स्थानाला महत्त्व आहे. यामुळे समूहातील एखादी व्यक्ती कमी झाली तर त्या व्यक्तीची उणिव भरून काढता येत नाही. उदा. कुटुंबाच्या मानच्या मृत्युमुळे निर्माण झालेली पोकळी तशीच कायम राहते. कारण या ठिकाणचे स्थान इतर व्यक्तीना भरून काढता येत नाही.

**५. सभासदत्वाची प्राप्ती** -

प्राथमिक समूहातील समस्याना जन्माबरोबर सभासदाची प्राप्ती होते. कुटुंबे, कुल, वंश, मित्र शेजारी यासारख्या प्राथमिक समूहाचा विचार केला तर या सदसत्वाची प्राप्ती जन्मतः प्राप्त होत असते. आणि ती अनिवार्य स्वरूपाची असते.

**६. यामधील व्यक्तीगत व स्वयंस्फुर्त संबंध -**

प्राथमिक समूहातील सदस्यातील संबंध हे सहज व स्वयंस्फूर्त असतात. मित्राने-मित्राशी किंवा कुटुंबातील व्यक्तीनी परस्परांशी कसे वागायचे याचा काही करार केलेला असत नाही. किंवा या गोष्टी शिकवाव्या लागत नाहीत. तर या परस्परांच्या संबधाना यामुळे व्यक्तीनिष्ठ स्वरूप प्राप्त होऊन उत्स्फुर्तपण परस्परांशी संबंध प्रस्थापित करतात.

**७ सदस्यामधील भावनात्मक संबंध-**

प्राथमिक समूहातील सदस्यांचे परस्पर संबंध अनौपचारिक असतात. विशिष्ट विशिष्ट कारणापुरते ते मर्यादित नसतात ते संबंध नैसर्गिक असतात. समूहातील सभासदाना परस्पराबद्दल प्रेम, सहानुभूती, आपुलकी, आत्मियता वाटत असते. आशा प्रकार या समूहातील संबंध भावनात्मक असतात त्यामुळे त्यांच्यात आम्हीची भावना निर्माण होते.

**८. सदस्यांचे संबंध सर्व समावेशक स्वरूपाचे असतात** -

प्राथमिक समूहातील सदस्याचे संबंध व्यापक आणि सर्वसमावेशक स्वरुपाचे असतात. एकमेकांच्या संपुर्ण व्यक्तीमत्त्वाशी हे संबंध निगडीत असतात. केवळ एखाद्या किंवा दुसऱ्या बाबीपुरता यांचा एकमेकांशी संबंध राहत नाही. तर परस्परांच्या संपुर्ण जीवनाशी समरस

झालेले असतात. त्यामुळेच प्राथमिक समूह समावेशक स्वरूपाचे असतात. उदा. वडिलांनी आपणास पॉकेट मनी दिला की नाही किंवा मुलगा महाविद्यालयात जातो किंवा नाही एवढ्यापुरतेच वडीलांचे सबंध निगडीत असत नाहीत. बडीलांचा दजा, त्यांचे आचरण, ते आपणासाठी घेत असलेले कष्ट त्यांचे आपल्यावरचे प्रेम याचीही मुलाला जाणीव असते, त्याचप्रमाणे मुलांची तब्येत, त्यांच शैक्षणिक यश, त्यांचे भवितव्य, त्यांची इतराबरोबरची संगत याची घरातील व बाहेरील वर्तवणूक त्यांचा गरजा याची वडीलांनी काळजी असते. केवळ त्यांचातील सबंध प्राथमिक नसतात तर सर्वसमावेशक स्वरूपाचे असतात.

**९. अनौपचारिक सामाजिक नियंत्रण** -

प्राथमिक समूहातील, सदस्य समूहाशी इतके एकजीव झालेले असतात की त्यामुळे त्यांच्या वर्तनाचे नियंत्रण प्राथमिक समूहाकडून होते. एवढेच नव्हे तर असे नियंत्रण करण्याचा परस्परांना हक्क आहे व तो योग्य आहे असे सदस्य मानत असतात. हे नियंत्रण अनौपचारिक असते उदा. पत्नीला आवडत नाही म्हणून कित्येक पती सिगारेट दारूसारख्या व्यसनापासून दूर राहतात, माझ्या वडीलांना आवडत नाही असे मुल थोडेसे अभिमानाने सांगतात.

## प्राथमिक समूहाचे महत्व -

जगाच्या पाठीवरील सर्वच समाजात प्राथमिक समूहाचे अस्तित्व आढळते. कुटुंब, मित्र, शेजारी, इत्यादी प्राथमिक समूह सर्व समाजात अस्तित्वान असतात. व्यक्तीचा जन्म कुटुंबात होतो. या कुटुंबातूनच मुलांचे सरंक्षण, सर्वधन केले जाते. सामाजिक प्रथा परंपरा, धर्मकल्पना, सामाजिक मुल्ले. इ. ओळख मुलांना प्राथमिक समुहातून होते. प्रामुख्याने समाजाच्या संस्कृतीची ओळख करून देणे, त्यांचे योग्य समाजीकरण करणे, त्याच्या व्यक्तीमत्वाची जडणघडण करणे, व्यक्तीच्या विविध गरजाची पुर्तता करणे, इत्यादी महत्वपूर्ण कार्य प्राथमिक समुहाकडुन केली जातात. त्याच बरोबर मानसिक गरजाची पुर्तता करणे, व्यक्तीमध्ये विविध विचार प्रेम, सहकार्य, इत्यादी भावनाची निर्मिती करणे, तसेच समाज जीवन जगण्यासाठी आवश्यक असणाऱ्या गुणांची निर्मिती करणे. हे प्राथमिक समूहाचे कार्य आहे. म्हणूनच इतर सामाजिक समूहापेक्षा समाजामध्ये प्राथमिक समूहांना अन्यन साधारण महत्व आहे.

### ब) दुय्यम समुह Secondary Group’s

सी. एच कुले यानी जी प्राथमिक समूहाची संकल्पना मांडली त्याच्या अगदी उलट स्थिती ज्या समरात दिसुन येते त्याना दुय्यम समूह असे म्हणतात. “जे समूह प्राथमिक नाहीत त्याना प्राथमिक

समूह म्हणता येईल” हॉर्टन आणि हट म्हणतात की दुय्यम समूह म्हणजे ज्या समूहातील सामाजिक संपर्क व्यक्ती निरपेक्ष तुटक व उपयुक्त-वादी असून लहान निकटवर्ती अत्यंत व्यक्तीगत आशा प्राथमिक समूहापेक्षा अत्यंत वेगळे. असतात". म्हणजे दुय्यम समूहातील सदस्यांत संपर्क व निकटतेचे प्रमाण अत्यंत कमी असते. आशा समूहाचा आकार मोठा असुन सदस्यामधील संबंधात जिव्हाळा व आपलेपणाचा अभाव असतो केवळ कामा-पुरते व्यक्तीनिरपेक्ष असे हे संबंध असतात. उदा. कामगार संघटना, राजकीय पक्ष, शहर, राष्ट्र वगैरे.

## दुय्यम समूहाची वैशिष्ट्ये-

दुय्यम समुहाची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे सांगता येईल-

### १- दुय्यम समूहाची निर्मिती-

दुय्यम समूहाची निर्मिती विशिष्ट हेतू किंवा उदिष्ट्य पुर्ण करण्यासाठी जाणिव पुर्वक करण्यात आलेली असते समान हेतु असणारे लोक एकत्र येतात आणि परस्परांशी सहकार्य करून आपला हेतु साध्य करण्याचा प्रयत्न करतात. आशा प्रयत्नामधूनच दुय्यम समूहाची निर्मिती होते.

### 2. संबंध अप्रत्येक्ष व व्यक्तिनिरपेक्ष असतात-

प्राथमिक समूहातील सदस्यांमध्ये संबंध समोरा-समोरच व सातत्याने येत असतात. त्यामुळे त्यांच्यात प्रत्येक्ष घनिष्ठता, निकटता व व्यक्तीगत संबंध दिसून येतात. पण कामगार संघटना शहर, कारखाना या सारख्या दुय्यम समूहातील सदस्यातील संबंध मात्र अप्रत्येक्ष त्यांच्यात निकटता फारच कमी असते दुय्यम समूहातील सदस्यांत सहकार्य असते पण ते अप्रत्यक्ष व कामापुरते म्हणजे संबंध व्यक्ती निरपेक्ष असतात.

### ३. आकाराची बधने नसते-

प्राथमिक समूहातील सदस्य संख्या लहान असते. त्यामुळे त्यांच्यात मोठ्या प्रमाणात निकटता दिसून येते. पण दुय्यम समूहांना सदस्य संख्येचे बंधन असत नाही. त्याचा आकार कितीही विशाल असू शकतो. कामगार संघटना व राष्ट्र हे दोन्हीही दुय्यम समूह आहेत.

### ४. भौतिक सानिध्याची गरज नाही -

प्राथमिक समूहातील संबंधान निकटता व आपलेपणाची भावना निर्माण होण्यासाठी सदस्यानी एकत्र राहणे, जेवण, फिरणे, खेळणे, विचारविनिमय करणे इत्यादी आवश्यक असते त्यासाठी भौतिक सानिध्यांची गरज असते. पण दुय्यम समूहात मुळातच निकटतेची आपलेपणाची गरज महत्त्वाची बाब नसते. शिवाय समूहातील सदस्यांची संख्या इतकी विशाल असते की हे सर्व दुर दुर राहत असतात. गरज लागलितर पोस्ट, टेलिफोन,टीव्ही, टेपरेकॉर्डर यासारख्या साधनानी संपर्क साधला जातो, तेव्हा दय्यम समूहाना भौतिक साधनांची गरज नाही.

**५. सदस्यत्व ऐच्छिक असते-**

कुटुंबासारख्या, खेडेगावासारख्या प्राथमिक समूहाचे आपोआप मिळते ते व्यक्तीच्या इच्छेवर असत नाही. मात्र दुयम समूहाचे सदस्यत्व स्वीकारण तो पुर्णत: व्यक्तीच्या इच्छेवर अवलंबुन असते. उदा. कामगार, संघटना, महिलामंडळ, या सारख्या समूहांचे सदस्यत्व निवडीचे स्वातंत्र्य व्यक्तीला असते.

**६. दृष्टीकोण साधन प्राप्त असतो-**

प्राथमिक समूहातील सदस्य प्राथमिक संबंध जगणे साध्य मानत असतात. पण दुय्यम समूहातील सदस्यांचा दृष्टीकोण साधन प्रधान असतो म्हणजे आशा संबंधातून आपला फायदा होता की नाही याला महत्व दिले जाते.

**७. करार प्राध्यानता-**

प्राथमिक समूहातील सदस्यात करार असत नाहीत. कुटुंबात कोणी कसे वागायचे, कोणाचे हक्क किती, कर्तव्य कोणती यासंबंधी करार नसतो पण त्यांच्यावर जबाबदा-या अमर्यादित असतात. पण दुय्यम समूह विशाल असतो. विशिष्ट हेतूंसाठी निर्माण झालेला असतो. त्यामुळे दुय्यम समूहातील सदस्यांना त्यांच्या हक्कांची व कर्तव्याची जाणीव स्पष्ट करून देणे आवश्यक असते. त्यामुळे दुय्यम समूहातील सदस्यांत करार प्राध्यानता दिसते.

**८. व्यक्तीमत्वाच्या मर्यादित भागावर परिणाम-**

व्यक्तीच्या व्यक्तीमत्वाच्या जडण-घडणीत व्यक्तीच्या सर्व भागावर प्रभाव प्राथमिक समूहाकडुन पडत असतो. मात्र दय्यम समूहातील सदस्य केवळ विशिष्ट होतुच्या पुर्तिस्तव एकत्र आल्याने व्यक्तीमत्वाच्या केवळ मर्यादित भागावर परिणाम होतो. ज्युदो- कराटेच्या क्लब मधुन सदस्याना केवळ ज्यूदो- कराटेचे शिक्षण मिळते.

## दुययम समूहाचे महत्व -

औद्योगिक क्रांतीने उद्योगप्रधान अर्थ व्यवस्था झाली नवीन तंत्रज्ञानाची, शिक्षणाची, उद्योग समूहांची गरज निर्माण झाली. यामुळे शहरीकरणाची प्रक्रिया वेगाने होऊ लागली. साहजिक आशा समाजात दुय्यम समूह निर्माण झाले. व्यक्तीच्या वाढत्या विविध गरजाची पूर्तता कुटुंब अगर मित्र-मंडळ यांच्याकडून होत नाही. त्यामुळे महाविद्यालय, संगीत, सभा, महिला मंडळ, संघटना राजकीय पक्ष, लायन्स क्लब, धर्मप्रसार मंडळे या सारख्या दुय्यम समूहाकडे विशिष्ट गरजाची पुर्तता करण्यासाठी लोक वाढत्या प्रमाणात धाव घेत आहेत.